# दिनांक १०-०६-२०१३ रोजी वनभवन नागपूर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक १०/०६/२०१३ रोजी अध्यक्ष, व्यवस्थापन समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीत खालील व्यवस्थापन समिती सदस्य/नामनिर्देशित सदस्य/केंद्रस्थ अधिकारी उपस्थीत होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. ए.के. जोशी | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर -अध्यक्ष |
| २ | श्री. सर्जन भगत | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा. नागपूर - सदस्य |
| ३ | श्री विनय कुमार सिन्हा, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (निर्सग पर्यटन व वन्यजीव प्रशासन) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर - सहअध्यक्ष यांचे वतीने |
| ४ | श्री. बी.एस. ठेंगडी | मुख्य वनसंरक्षक (दक्षता व कर्मचारी कल्याण), नागपूर - कोषाध्यक्ष, कार्यकारी समिती |
| ५ | श्री. एस.जी. टेंभूर्णीकर | मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन) नागपूर - सदस्य सचिव |

## व्यवस्थापन समितीवर नामनिर्देशित सदस्य

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री. एस. डी. अत्रे | प्रशासकीय अधिकारी, | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. ए. के. पथे | वनक्षेत्रपाल | प्र.मु.व.सं. यांचे कार्यालय |
| ३ | श्री. आर. एन. पाटील | लेखापाल | कोल्हापूर वनवृत्त |
| ४ | श्री. डी.एन. सुर्यवंशी | वनपाल | ठाणे वनवृत्त |
| ५ | श्री. एस. ओ. बोरेकर | वनरक्षक | यवतमाळ वनवृत्त |
| ६ | श्री. गजानन घोडकी | शिपाई | औरंगाबाद वनवृत्त |

## नाम निर्देशित केंद्रस्थ अधिकारी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री एस. के. थापलीयाल | विभागीय वन अधिकारी (योजना) | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री व्ही. टी.घुले | विभागीय वन अधिकारी (योजना) | अमरावती वनवृत्त |
| ३ | श्री. व्ही. व्ही. पाटोळे | विभागीय वन अधिकारी (योजना) | यवतमाळ वनवृत्त |
| ४ | श्री एस.बी. वळवी | विभागीय वन अधिकारी (योजना) | ठाणे वनवृत्त |
| ५ | श्री एस.बी. फुले | विभागीय वन अधिकारी (योजना) | पुणे वनवृत्त |
| ६ | श्री डी.व्ही. गांधळीकर | विभागीय वन अधिकारी (योजना) | धुळे वनवृत्त |

<u>इतर प्रतिनिधी</u>

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री के.एफ. डोंगरे, स.व.सं | प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे - सदस्य यांचे वतीने | मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक, सामाजिक वनीकरण, नागपूर |
| २ | श्री. डी.डी. आंधळगांवकर, कार्यालय अधिक्षक | | मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक, सामाजिक वनीकरण, नागपूर |
| ३ | श्री एस. पी. औटी, मुख्य लेखापाल | श्री एन.एस गरूड, मुख्य लेखापाल - नामनिर्देशित सदस्य यांचे वतीने | नाशिक वनवृत्त |
| ४ | श्री एम. ए. हमिद, लिपीक | श्री. बी. एच. पाटील, विभागीय वन अधिकारी (योजना) यांचे वतीने | गडचिरोली वनवृत्त |

२.०० सर्वप्रथम सदस्य सचिवांनी सदर बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांचे परवानगीने पदसिध्द सदस्य सचिव यांनी सन २०१२-१३ या वर्षासाठी एकुण १४२१३ सभासद झाले बाबत माहिती दिली तसेच सदर योजना कार्यान्वयीत झाल्यापासून मृत सभासदांचे कुटुंबियांना तसेच सभासदांचे पाल्यांना देण्यात येणा-या व दिलेल्या फायदयांबाबतची माहिती विषद केली.

अ) महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजना स्थापित झाल्यापासून आजपावेतो अपघाती मृत्यू प्रकरणी एकुण ४० मृत सभासदांचे कुटूंबियांना विमा रक्कम रुपये १.५८ कोटी अदा करण्यात आली आहे. तसेच ०१ मृत सभासदाचा विमा दावा विमा कंपनी स्तरावर तर ०५ मृत सभासदांचे विमा दावे विभागीय समिती स्तरावर प्रलंबित आहेत.

ब) गट-क व गट-ड या संवर्गातील कार्यरत सभासदांचा नैसर्गिक कारणास्तव मृत्यू झाल्यास दिनांक ०४/०६/२०११ पासून रुपये २५,००० या वाढीव दराने आर्थिक सहाय्य त्यांचे कुटूंबियास त्वरीत विभागीय समिती स्तरावर अदा करण्यात येते. योजना सुरू झाले पासून आजपावेतो नैसर्गिकरित्या १२३ मृत सभासदांच्या कुटुंबियांना याचा लाभ देण्यात आला असुन एकुण रूपये ४०.४० लक्ष अदा करण्यात आले आहे. (५२ मृत सभासदांचे कुटुंबियांना रूपये १०,०००/- , दिनांक १०/०६/२०१० नंतर मृत झालेले २१ सभासदांचे कुटुंबियांना रूपये २०,०००/- व दिनांक ०४/०६/२०११ नंतर मृत झालेले ४४ सभासदांचे कुटुंबियांना रूपये २५,०००/- तसेच अपघाती मृत्यू प्रकरणी एक विशेष बाब म्हणून २ सभासदांचे कुटुंबियांना प्रत्येकी रूपये २.०० लक्ष तर ४ सभासदांचे कुटुंबियांना प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष अदा करण्यात आले आहे).

क) गट-क व गट-ड संवर्गातील कार्यरत सभासदांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबियाना विमा रक्कम पुरविण्यात येते, तसेच रक्कम पुरविण्यास काही कालावधी लागत असल्यामुळे त्यांचे कुटूंबियांना प्रती सभासद रुपये २०,०००/- या दराने मदत म्हणून आगाऊ रक्कम रूपये ६०,०००/- तीन मृत सभासदाच्या कुटुंबियांना अदा करण्यात आली.

ड)	पुस्तकीय अनुदान

गट `क` व गट `ड` संवर्गातील सभासदांचे पाल्यांना इयत्ता ८ वी पासुन ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास खालील प्रमाणे पुस्तकीय अनुदान देण्यात येते. विभागीय समिती कडून ०५ सभासदांचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाले. त्यावर या कार्यालयाव्दारे त्यांचे विभागीय स्तरावर रक्कम अदा करण्याच्या सूचना दिल्या.

इ)	वैद्यकीय कर्ज

सभासदांचे तसेच त्यांचे कुंटुंबियांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुपये १०,०००/- चे मर्यादेपर्यंत वैद्यकीय कर्ज मंजूर करण्यात येते. विभागीय समिती कडून ०३ सभासदांचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाले. त्यावर या कार्यालयाव्दारे त्यांचे विभागीय स्तरावर रक्कम अदा करण्याच्या सूचना दिल्या.

फ)	पारीतोषिक देणेबाबत :-

गट-क व गट-ड संवर्गातील सभासद कर्मचा-याचे पाल्यांना १० वी व १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये २०००/- व ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये ५०००/- पारितोषिक स्वरुपात देऊन त्यांचा विभागीय समिती स्तरावर सत्कार करण्यात येतो. सदर योजनेच्या अनुषंगाने अद्याप २१ सभासदांच्या पाल्यांना पारितोषिक देण्यात आले आहे.

ग)	गट क  व गट ड मधील सदस्य कर्मचा-यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देणे बाबत-

गट क व गट ड संवर्गातील ज्या सभासद कर्मचा-यांचा अचानक मृत्यु झाला व त्यांचे कुटुंबाचे निवृत्ती वेतन रुपये ५०००/- प्रतीमाह पेक्षा जास्त नाही अशा सभासदाचे फक्त २ अपत्यासाठी प्रत्येकी रुपये २००/- प्रतीमाह याप्रमाणे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. अद्याप १ मृत सभासदाचे कुटुंबियांकडून अर्ज प्राप्त झाला असून त्यांचे पाल्यास सन २०१०-११ ते सन २०१२-१३ या वर्षाकरीता रूपये २००/- प्रतिमाह या दराने रूपये ६०००/- अदा करण्यात आले आहे.

ह)	महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी  कल्याण निधी बाबतची माहिती सर्व विद्यालये व महाविद्यालयांमधील प्रशिक्षण कार्यक्रम/कायर्शाळा अभ्यासक्रमात समाविष्ट करणेबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) पूणे यांना अध्यक्ष व्यवस्थापन समिती यांनी सूचना दिल्या.

जे)	महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीची माहिती प्रकाशित करणे.

वन व सामाजिक वनीकरण विभागातील प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी जसे शिपाई, लिपीक, लेखापाल, मुख्य लेखापाल, वनमजूर, वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, इत्यादी सर्व संवर्गातील प्रत्येक व्यक्तिंना वनकल्याण निधीचा लाभ कशाप्रकारे मिळतात याची माहिती असावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीची माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे.

४.०० सदर बैठकीमध्ये नव्याने आलेले खालील विषयावर चर्चा करण्यात आली .

| विषय क्रमांक | संक्षिप्त विषय | झालेली चर्चा व त्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|
| ४ (अ) | सन २०१३-१४ वर्षाकरीता विमा कंपनीची निवड करणे बाबत | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, सन २०१३-२०१४ या वर्षा करीता वन कल्याण निधीचे सभासदांचा दिनांक ११/०८/२०१३ पासून १०/०८/२०१४ पर्यंत एक वर्षाकरीता विमा काढायचा असल्यामुळे एकुण १३ विमा कंपन्यांकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यापैकी ४ विमा कंपन्यांकडून दरपत्रक प्राप्त झाले असुन त्यांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांचे दर सेवा कर मिळून १०,००० व १५००० सभासदांकरीता रुपये ३०५/- प्रती सभासद व २०,००० सभासदांकरीता रुपये २७४/- प्रती सभासद हे इतर विमा कंपन्यांच्या दरपत्रकांच्या तुलनेत कमी आहे त्यामुळे ते मंजूर करण्यास हरकत नसावी. सन २००७-०८ ते सन २०१२-१३ पर्यंत (सन २०११-१२ वगळता) ५ वर्षाच्या कालावधीत दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी, नागपूर यांचेकडूनच सभासदांचा विमा उतरविण्यात आला होता. मागील ५ वर्षात ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांनी दिलेली सेवा समाधानकारक होती. म्हणून ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांचे दराला मान्यता देणेबाबत सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीची मंजूरीस्तव सादर करण्यात आले. त्यास व्यवस्थापन समितीने मान्यता प्रदान केली. | कार्यकारी समिती |
| ४(ब) | सन २०१३-१४ या वर्षासाठी सभासदांकडून स्विकारायचे वर्गणी व विमा शुल्क निश्चित करणे. | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, शासन निर्णय दिनांक ०९/०८/२००६ नुसार वर्ष २००६-०७ नंतर सभासद वर्गणी निश्चित करण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला आहे. मागील वर्षी सर्व सभासदांकडून सभासद शुल्क रूपये ११६/- + विमा शुल्क रूपये ३८४/- असे एकुण रूपये ५००/- वसूल करण्यात आले आहे. या वर्षी देखील विमा कंपनींकडून प्राप्त झालेले दरपत्रकांमध्ये सर्वात कमी विमा प्रिमीयम राशी रूपये ३०५/- प्रतीसभासद ही असल्याने या वर्षी देखील सभासद शुल्क रूपये १९५/- + विमा शुल्क रूपये ३०५/- असे एकुण रूपये ५००/- वसूल करणेबाबत प्रस्तावीत करण्यात आले. त्यास व्यवस्थापन समितीने मंजूरी प्रदान केली. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४(क) | ज्या सभासदांचा अपघाती मृत्यू झाला परंतु विमाअभावी त्यांचे कुटुंबियांना विमा राशी मिळू शकली नाही अश्या सभासदांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत | सदस्य सचिवांनी बैठकीत युनायटेड इंडिया इन्श्योरेन्स कंपनी, नागपूर यांनी सन २०११-१२ वर्षाकरीता (दिनांक ०१ ऑगष्ट,२०११ ते ३१ जुलै,२०१२ पर्यंत) झालेला करार त्यांचे विमा कंपनीस २०० % पेक्षा जास्त नुकसान झाल्यामुळे दिनांक ०३/०३/२०१२ रोजी एकतर्फी संपुष्टात आणला. तदनंतर दि. ओरीएन्टल इन्श्यरेंस कंपनी यांचेकडे दिनांक २७/०४/२०१२ ते १०/०८/२०१२ या कालावधीकरीता सभासदांचा विमा काढण्यात आला होता. तथापी दिनांक ०३/०३/२०१२ ते २६/०४/२०१२ या कालावधीत ज्या सभासदांचा अपघाती मृत्यू झाला त्या सभासदांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून प्रत्येकी रुपये ४.०० लक्ष आर्थिक सहाय्य देणे बाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे मंजूरीस्तव सादर केला. त्यावर व्यवस्थापन समितीने मंजूरी दिली<br><br>१) स्व. श्री. सिताराम महादेवराव वाढवे, अधिसंख्य वनमजूर - मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर<br>२) स्व. श्री. रविंद्र मधूकर ठाकरे, वनरक्षक - उपवनसंरक्षक सिरोंचा वनविभाग, सिरोंचा. | कार्यकारी समिती/ संबंधित विभागीय समिती |
| ४(ड) | सन २०१३-१४ या वर्षासाठी सभासद संख्येत वाढ करणेबाबत. | सदस्य व्यवस्थापन समिती तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) यांनी सभेत उपस्थितांना अवगत केले की, सन २०१३-१४ या वर्षाकरीता सभासद संख्या ९०% पर्यंत वाढविण्याचे उद्दीष्ट आहे. याबाबत सर्व वनवृत्तांना या आधिच सूचना दिलेल्या आहेत. सर्व केंद्रस्थ अधिका-यांना त्यांचे वनवृत्तात कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचा-यांकडून माहे जुलै २०१३ मध्ये देय होणा-या माहे जुन २०१३ च्या वेतनातुन सभासद व विमा शुल्क कपात करून ९०% चे उद्दीष्ट साध्य करणेबाबत सूचना दिल्या. महोदयांनी अश्याही सूचना दिल्या की, सर्व विभागीय समितींना कार्यकारी समितीकडे रक्कम RTGS/NEFT व्दारे स्थानांतरीत करण्याच्या सूचना दिल्या असतांनाही काही विभागीय समिती धनादेश/धनाकर्षाव्दारे रक्कम कार्यकारी समितीकडे पाठवित आहेत. तसेच काही विभागीय समितींमध्ये वनक्षेत्रपाल कार्यालयाकडून परस्पर कार्यकारी समितीकडे सभासदांचे अर्ज/यादया तसेच रक्कम पाठविली जात आहे. त्यामुळे विभागीय समितीस्तरावर | कार्यकारी समिती/ विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याचा हीशोब राहणार नाही. तरी सर्व विभागीय समितींनी त्यांचे अधिनस्त असलेले वनपरिक्षेत्र अधिकारी यांना विभागीय समितीमार्फतच अर्ज/यादया व रक्कम कार्यकारी समितीकडे पाठविणेबाबत सूचना दयाव्यात. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून कार्यकारी समितीकडे परस्पर प्राप्त झालेले अर्ज/यादया व रक्कम स्विकार्य होणार नाही. तसेच काही विभागीय समितींकडून रक्कम कार्यकारी समितीच्या खात्यात स्थानांतरीत केली जाते तथापी ज्या सभासदांची रक्कम स्थानांतरीत केली आहे त्या सभासदांची यादी कार्यकारी समितीकडे पाठविली जात नाही अश्या परिस्थीतीत सभासदांचा विमा काढणे शक्य नाही. सर्व विभागीय समितींनी सभासदांचे अर्ज/यादया व स्थानांतरीत केलेल्या रक्कमेचा तपशिल एकमुस्ततेने कार्यकारी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.<br><br>अध्यक्षांनी अश्या सूचना दिल्या की, वनवृत्त/ विभागीय स्तरावर/वनक्षेत्रपाल स्तरावर वनकल्याण निधी योजनेकडे पाहीजेतेवढे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे खालचे स्तरावर कर्मचा-यांना या योजनेची माहिति होत नाही व त्यामुळे काही वनविभागांची सभासद संख्या फारच कमी आहे. मागील वर्षी वन व सामाजिक वनीकरण विभागात ५४४० रोजंदारी मजूरांना कायम करण्यात आले आहे. त्यामुळे सन २०१३-१४ या वर्षाकरीता सभासद संख्या २०,००० (वीस हजार) होणे अपेक्षित आहे. सदर वर्षी ज्या वनविभागाची सभासद संख्या ९० टक्के पेक्षा कमी राहील तसेच वन कल्याण निधी योजने संबंधी काम असमाधानकारक राहील त्या वनविभागातील संबंधित अधिका-यांच्या गोपनीय अहवालात यांची नोंद घेण्यात येईल. | |
| ४(इ) | वनवृत्त/वन विभाग स्तरावर विभागीय समितीची स्थापना करणे तसेच विभागीय समितींची वेळोवेळी बैठक आयोजीत करणे. | अध्यक्षांनी उपस्थित केंद्रस्थ अधिकारी यांना त्यांचे वनवृत्तात विभागीय समितीची स्थापन झाली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता कोणतेही केंद्रस्थ अधिकारी (DFO Planning) याबाबत समाधानकारक उत्तर देवू शकले नाही. यावर अध्यक्षांनी अश्या सूचना दिल्या की, सर्व वनवृत्त/वनविभागात विभागीय समितीची स्थापना करण्यात यावी तसेच वेळोवेळी विभागीय समितीची बैठक आयोजित करण्यात यावी. तसेच त्यांचे अधिनस्त असलेले कर्मचा-यांना वनकल्याण निधी योजनेचे महत्व पटवून जास्तीत जास्त कर्मचा-यांना सभासद होण्यास उदयुक्त करावे. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४(फ) | कार्यकारी समितीकडे प्राप्त होणा-या मुदत ठेवीच्या व्याजातुन कल्याणकारी योजना राबविणे बाबत | कार्यकारी समितीकडे प्राप्त होणा-या मुदत ठेवीच्या व्याजातुन काही कल्याणकारी योजना राबविल्यास कर्मचा-यांमध्ये या योजनेबाबत आपुलकी निर्माण होवून सभासद संख्या वाढण्यास मदत मिळेल. या उद्देशाने खालील नमूद योजन राबविण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे मंजूरीस्तव ठेवण्यात आला:-<br>१) मृत सभासदांच्या पाल्यांना किंवा त्यांच्या विधवा पत्नीना त्यांचे पात्रतेनुसार उत्पन्न वाढविणेकरिता व्यावसायिक प्रशिक्षण जसे संगणक, टंकलेखन, लघुलेखन, शिलाई<br>२) वृत्त स्तरावर रक्तदान शिबीर आयोजीत करणे.<br>सदर प्रस्तावावर बैठकीत चर्चा झाली असता खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>१) वृत्त स्तरावर रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येईल. तसेच वृत्तस्तरावर सामान्य दरावर सभासदांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.<br>२) मृत सभासदांच्या पाल्यांना किंवा त्यांच्या विधवा पत्नीना त्यांचे पात्रतेनुसार उत्पन्न वाढविणेकरिता व्यावसायिक प्रशिक्षण (जसे संगणक, टंकलेखन, लघुलेखन, शिलाई) फक्त शासन मान्य संस्थांमार्फतच दिले जाईल व या करीता प्रत्यक्षात येणारा प्रशिक्षण व साहित्य खर्च किंवा कमाल मर्यादा रूपये २५०००/- इतका खर्च वनकल्याण निधीतुन केला जाईल. ही रक्कम विभागीय समिती त्यांचेस्तरावर मंजूर करून अदा करतील. जर संबंधित विभागीय समितीकडे पर्याप्त रक्कम शिल्लक नसल्यास रक्कम मंजूरीचा प्रस्ताव कार्यकारी समितीकडे सादर केला जाईल. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ४(ग) | मृत सभासदांचे पाल्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती साठी कुटुंब निवृत्ती रूपये ५०००/- च्या मर्यादेत वाढ करणेबाबत. | सदस्य सचिवांनी अवगत केले की, सध्या ज्या मृत सभासदांचे कुटुंबाचे निवृत्ती वेतन रूपये ५०००/- पेक्षा जास्त नाही अशा मृत सभासदांचे पाल्यांना शिष्यवृत्ती देण्याचे प्रावधान आहे. तथापी ६ व्या वेतन आयोगामध्ये निवृत्ती वेतनात झालेल्या वाढीमुळे निवृत्ती वेतन रक्कमेच्या किमान मर्यादेत वाढ करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर बैठकीत चर्चा झाली असता खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १) गट `ड` संवर्गातील ज्या सभासद कर्मचा-यांचा अचानक मृत्यु झाला अशा सभासदाचे फक्त २ अपत्यासाठी प्रत्येकी रुपये २००/- प्रतीमाह याप्रमाणे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल.<br>२) गट `क` संवर्गातील ज्या सभासद कर्मचा-यांचा अचानक मृत्यु झाला व त्यांचे कुटुंबाचे निवृत्ती वेतन रुपये १०,०००/- प्रतीमाह पेक्षा जास्त नाही अशा गट `क` संवर्गातील मृत सभासदाचे फक्त २ अपत्यासाठी प्रत्येकी रुपये २००/- प्रतीमाह याप्रमाणे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येईल. | |
| ४(ह) | सभासदांचे पाल्यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कमेत वाढ करणेबाबत | सचिवांनी असे अवगत केले की, दिनांक १०/०४/२०१३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीत सार्वनुमते असे ठरले की, सध्या ज्या सभासद कर्मचा-याचे पाल्यांना १० वी / १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये २०००/- व ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये ५०००/- पारितोषिक स्वरुपात देवून त्यांचा सत्कार विभागीय समिती स्तरावर करण्यात येतो. तथापी सदर रक्कम ही फार कमी असल्याने त्यात खालील प्रमाणे वाढ करण्यात यावी जेणेकरून कर्मचाऱ्यांमध्ये वनकल्याण निधी बाबत उत्सुक्ता वाढुन सभासद संख्येत वाढ होवू शकेल.<br><u>टक्केवारी</u> <u>प्रस्तावित रक्कम</u><br>१) ९० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण - रू. ५०००/-<br>२) ९५ % किंवा त्यापेक्षा जास्त गुण - रू. १००००/-<br>सदर प्रस्तावावर बैठकीत चर्चा झाली असता असा निर्णय घेण्यात आला की गट `अ` ते गट `ड` संवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांचे पाल्यांना १० वी व १२ वी बोर्डाचे परिक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये ५०००/- व ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असेल अशा पाल्यांना रुपये १००००/- पारितोषिक स्वरुपात देवून त्यांचा सत्कार विभागीय समिती स्तरावर करण्यात येईल. सदर वाढीव रक्कम ही सन २०१२-१३ या शैक्षणीक वर्षात उत्तीर्ण झालेल्या पाल्यांना सुध्दा अनुज्ञेय राहील. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४(जे) | विभागीय समितींकडे किरकोळ खर्चासाठी ठेवण्यात येणा-या रक्कम रूपये २०,०००/- मध्ये वाढ करणेबाबत. | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे यांनी किरकोळ खर्चाकरीता प्रत्येक वनविभागांकडे कमीतकमी ५००००/- इतकी रक्कम शिल्लक ठेवणे अत्यावश्यक असलेबाबत कळविले असून एप्रिल-२०१३ पासून विभागीय समितीकडील खात्यामध्ये रक्कम रू. ५००००/- शिल्लक ठेवण्यास व्यवस्थापन समितीची मान्यता देणेबाबत विनंती केली आहे.<br>सदर प्रस्तावावर बैठकीत चर्चा झाली असता असा निर्णय घेण्यात आला की विभागीय समितीकडे किरकोळ खर्च भागविण्याकरीता जास्तीत जास्त रक्कम रूपये २५,०००/- विभागीय समितीचे बचत खात्यात शिल्लक ठेवली जाईल व उर्वरित रक्कम कार्यकारी समितीकडे स्थानांतरीत केली जाईल. विभागीय समितीला रूपये २५,०००/- पेक्षा जास्त रक्कमेची आवश्यक्ता भासल्यास कार्यकारी समितीस तसा प्रस्ताव पाठविला जाईल व कार्यकारी समितीव्दारे संबंधित विभागीय समितीचे खात्यात आवश्यक तेवढी रक्कम स्थानांतरीत केली जाईल. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ४(के) | वनकल्याण निधी योजनेकरीता देणगी जमा करणेबाबत | सदस्य सचिवांनी असे मत व्यक्त केले की, वनकल्याण निधीचे बळकटीकरणासाठी शासन निर्णय दिनांक ०९/०८/२००६ मधील तरतुदीनुसार देणगी स्विकारता येते. त्या अनुषंगाने वन विभागाअंतर्गत येणा-या पर्यटन स्थळांमध्ये पर्यटकांकडून उपकर घेता येईल त्यामुळे वनकल्याण निधीच्या रक्कमेत वाढ होवू शकते. यावर बैठकीत चर्चा झाली असता कोणकोणत्या माध्यमातून देणगी प्राप्त होवू शकते विभागीय समित्यांनी याबाबत प्रयत्न करावे असे ठरले. | विभागीय समिती (सर्व) |

सभेअंती सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

स्वा/- xxxxxxxxx
अध्यक्ष, व्यवस्थापन समिती
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी
तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर